**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

२१ जानेवारी २०२०

## आविष्कार स्पर्धेच्या राज्यस्तरीय फेरीसाठी

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून ४८ संघांची निवड

### - राज्यस्तरीय फेरी २९ ते ३१ जानेवारी दरम्यान मुंबईत रंगणार

पुणे -

विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढीस लागावी यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या आविष्कार स्पर्धेची विद्यापीठस्तरीय फेरी आज (२१ जानेवारी २०२०) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात पार पडली. त्यातून विद्यापीठाच्या ४८ संघांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. या स्पर्धेची राज्यस्तरीय फेरी मुंबई येथे २९ ते ३१ जानेवारी २०२० या काळात होणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती जागृत व्हावी आणि त्यासाठी त्यांना चालना मिळावी, हा या स्पर्धेचा उद्देश आहे. राज्याचे माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांनी २००६ मध्ये ही स्पर्धा सुरू केली. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची कामगिरी उत्तम राहिली आहे. आतापर्यंतच्या १३ स्पर्धांमध्ये विद्यापीठाने ९ वेळा विजेतेपद, तर ४ वेळा उपविजेतेपद पटकावले आहे. या वेळच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून विविध विद्याशाखा आणि विविध गटांमधून एकूण ४८ संघ सहभागी होणार आहेत.

त्यासाठी जिल्हास्तरावरील फेरीतून २३७ संशोधन संकल्पनांची विद्यापीठस्तरीय फेरीसाठी

निवड करण्यात आली होती. या संघांनी आज विद्यापीठात सादरीकरण केले. त्यात नाविन्यपूर्ण आणि कल्पक संकल्पनांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी अतिशय मेहनत घेतली असल्याचे दिसून आले. त्यांनी आपापल्या संकल्पनांचे उत्तमरीत्या सादरीकरण केले. त्यातून ४८ संघ निवडण्यात आले आहेत. हे संघ मुंबईत होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाकडून (Internal Quality Assurance Cell) देण्यात आली.

आजच्या विद्यापीठस्तरीय फेरीचे उद्घाटन उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आविष्कार नियोजन समितीचे सदस्य डॉ. मनीष वर्मा, डॉ. रवींद्र जायभाय, उपकुलसचिव एम. व्ही. रासवे, आदी. उपस्थित होते.

---

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com